श्री. सुधाकर शंकर कुमावत, उप कोषागार अधिकारी यांना निलंबनातून मुक्त करुन शासन सेवेत पुन:स्थापित करण्याबाबत.....

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-०१.
20 DEC 2022
प्राप्त झाले सही.......

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन आदेश क्रमांक : संकीर्ण २०२२/प्र.क्र.४५/कोषा-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० डिसेंबर, २०२२

संदर्भ : १) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे आदेश संलेको १२-२०२१/प्रशा-राप-सलेअ/टिस-१/आर-२७५०/श्री.कुमावत/निलंबन/८२८, दि. २९.१२.२०२१

२) शासन आदेश समक्रमांक दिनांक ११.११.२०२२

३) संचालक . लेखा व कोषागारे यांचे पत्र क्र. आदेश संलेको १२-२०२१/प्रशा-राप-सलेअ/टिस-४/श्री. कुमावत/पुर्नस्थापना/अंशत: बदल/ ७४७/५६ ४९०० दि. २.१२.२०२२

## शासन आदेश

श्री. सुधाकर शंकर कुमावत, उपकोषागार अधिकारी यांना संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे संदर्भाधीन दिनांक २९.१२.२०२१ च्या आदेशान्वये दिनांक २०.१२.२०२१ पासून निलंबित करण्यात आले आहे.

२. प्रशासकिय विभाग स्तरावर गठीत केलेल्या निलंबन आढावा समितीसमोर उपरोक्त निलंबीत अधिकारी यांच्या निलंबनाचा आढावा दिनांक ०३.०६.२०२२ रोजी घेण्यात आला आहे. सदर निलंबन आढाव्यात निलंबन आढावा समितीने श्री. सुधाकर शंकर कुमावत, उपकोषागार अधिकारी (निलंबित)यांची शासन सेवेत पुन:स्थापना करण्यात येऊन महसूली विभागाबाहेर अकार्यकारी पदावर त्यांची पदस्थापना करण्याची शिफारस केली आहे.

निलंबन आढावा समितीची शिफारस विचारात घेऊन शासनाच्या संदर्भाधिन क्र. २ दिनांक ११.११.२०२२ च्या आदेशान्वये निलंबीत श्री. सुधाकर शंकर कुमावत, उपकोषागार अधिकारी यांची पुन:स्थापना तसेच पदस्थापना सहायक लेखाधिकारी, या पदावर संचालक, नागरी संरक्षण दल, मुंबई या कार्यालयात करण्यात आली होती



Scanned By Camera Scanner

सदर दिनांक ११.११. २०२२ च्या आदेशात अंशत: बदल करुन खालील विवरणपत्रामध्ये निलंबीत अधिकारी श्री. सुधाकर शंकर कुमावत, उपकोषागार अधिकारी यांची शासन सेवेत पुनःस्थापना करण्यात येऊन त्यांची महसूली विभागाबाहेर अकार्यकारी पदावर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदावर पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | निलंबीत अधिकारी यांचे नाव व पदनाम महसूली विभाग व कार्यालय | निलंबन आढावा समितीची शिफारस विचारात घेऊन प्रस्तावित पुनःस्थापनेनंतरचा महसूली विभाग व पदस्थापना |
|---|---|---|
| १ | श्री. सुधाकर शंकर कुमावत, उपकोषागार अधिकारी, उपकोषागार कार्यालय वाई, जिल्हा-सातारा<br>महसूली विभाग-पुणे | सहाय्यक लेखा अधिकारी, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालय<br><br>महसूली विभाग- कोकण-२ |

३. तद्नुसार, श्री. कुमावत (निलंबित) यांना न्यायालयीन निर्णयाच्या व विभागीय चौकशीच्या अधीन राहून निलंबनातून मुक्त करुन शासन सेवेत पुनःस्थापित करण्यात येत आहे. हे आदेश तात्काळ अंमलात येतील. श्री. कुमावत यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी त्वरीत रुजू होऊन त्याबाबतचा रुजू अहवाल शासनास सादर करावा, अन्यथा त्यांची ही अनधिकृत गैरहजेरी म्हणून समजण्यात येईल, तसेच त्यांच्या निलंबन कालावधीबाबतचा निर्णय हा न्यायालयीन निर्णय व विभागीय चौकशीचा निर्णय यावर अवलंबून राहील .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

मु.नि.धुरी

( मु.नि. धुरी )
सहसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

श्री. सुधाकर शंकर कुमावत, उपकोषागार अधिकारी (संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

(१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता (महाराष्ट्र) १ व २ मुंबई/नागपूर.
(२) महालेखापाल (लेखा परीक्षा (महाराष्ट्र) १ व २ मुंबई/नागपूर .
(३) अपर मुख्य सचिव(वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई ३२
(४) अपर मुख्य सचिव (ले. व को.) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
(५) विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, कोकण भवन, नवी मुंबई. *
(६) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई



Scanned By Camera Scanner

(७) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, सातारा *
(८) पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा.*
(९) कक्ष अधिकारी कोषाप्रशा-२,वित्त विभाग मंत्रालय, मुंबई-३२.
(१०) निवड नस्ती कोषाप्रशा-१, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

**(*संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्यामार्फत)**



Scanned By Camera Scanner